20-21
conf.

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

November -2020

SPECIAL ISSUE NO - CCLX (260)

## INDIAN WOMEN : PRESENT, PAST AND FUTURE



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor:**
Dr.R.M.Hajari
Principal
Sham Gadale Art's Collage,
Dahiphal (Wadmauli)
Tq.KAJJ,.Dist. BEED.

**Editor:**
Dr.S.N.Jadhavar
Head. Deptt. of History,
Sham Gadale Art's Collage,
Dahiphal (Wadmauli)
Tq.KAJJ,.Dist. BEED.

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

M.G. Arts, Science & late N.P. Commerce College, Armori

| | | |
|---|---|---|
| 47 | अतुल्य भारत : राष्ट्र और धर्ममेंमहाराष्ट्र धर्म—हिंदवीराज्य का योगदान<br>डॉ. भांगे चंद्रकांत बन्सीधर | 178 |
| 48 | मराठी स्त्रीवादी साहित्यात नियतकालिकांचे योगदान<br>योगिता कालिदास चोडणकर | 180 |
| 49 | नारी जागृतीच्या अग्रदूत - श्रीमती लक्ष्मीबाई केळकर डॉ. देवर्षी मुकूंद अरविंद | 186 |
| 50 | संतजनाबाई आणि त्यांच्या अभंगातुन समाजातील वास्तविक स्वरुप<br>दिपिका हिम्मत पवार | 189 |
| 51 | १९९० नंतरच्या स्त्रीवादी कवितेतील जाणिवा<br>डॉ.फारुक अहमद साबतांबोळी | 193 |
| 52 | महिलांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान<br>प्रा.डॉ.गजानन नत्थुजी कळंबे | 197 |
| 53 | भारतातील लिंगभाव समस्या : एक गंभीर समस्या<br>प्रा. गजेंद्र एम. कढव | 202 |
| 54 | गांधीजींच्या आत्मकथनातून दिसणारे स्त्री विश्व प्रा. डॉ. गणेश राऊत | 205 |
| 55 | विविध जातीजमाती मधील स्त्रियांचे आर्थिक उत्पन्नातील महत्व<br>प्रा. डॉ. गव्हाळे बी.व्ही | 211 |
| 56 | साईबाई : परिवर्तनाच्या वाटेवरील नंदादीप प्रा. डॉ. गोविंद काळे | 216 |
| 57 | बीड जिल्ह्यातील लिंगगुणोत्तराचा भौगोलीक अभ्यास डॉ.बापूराव त्रिंबक गुजर | 219 |
| 58 | हैदराबाद मुक्ती लढ्यात : स्त्रियांचे योगदान हाके रेणुका प्रकाशराव | 226 |
| 59 | भारतमें महिलाओं के सशक्तीकरण में शिक्षा की भूमिका और राष्ट्र निर्माण<br>हर्षकुमार | 230 |
| 60 | महिला अत्याचार प्रा. सचिन पंढरी खेडकर | 235 |
| 61 | भारतीय प्रशासनातील महिलांचे योगदान डॉ.पी.एस.लोखंडे | 240 |
| 62 | भारतीय स्वतंत्रय क्रांतिकारी स्त्रियाचे योगदान लोणकर सिंधू निवृत्ती | 242 |
| 63 | भारतमें आदर्श संसदीय लोकतन्त्र चन्द्रप्रकाश माली | 246 |
| 64 | क्रांती विरांगना इंदुताई पाटणकर प्रा.डॉ.सौ.मंजिरी म. कुलकर्णी | 254 |
| 65 | स्रिशिक्षणाची प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक काळातील वाटचाल<br>प्रा. स्मितल रावसाहेब मोरे | 258 |
| 66 | भारतीय समाजातील कन्या भ्रुणहत्या : कारणे आणि उपाय योजना<br>प्रा. मंदाकिनी निहीते /डॉ. बी. एम. कन्हाडे | 263 |
| 67 | महात्मा जोतीबा फुले कालीन स्त्री जीवन<br>प्रा.डॉ.नितीन बावळे / पांढरकर श्रीधर मुरलीधरराव | 267 |
| 68 | समकथाओ में नारी पंखी सेनापति | 270 |
| 69 | ग्रामीण महिलाओं की समस्याएं प्रेमकिशोर बेड़ा | 274 |



Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

# भारतातील लिंगभाव समस्या : एक गंभीर समस्या

प्रा. गजेंद्र एम. कढव
सहायक प्राध्यापक महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी

प्रस्तावना – स्त्री–पुरुष हे निसर्गाने निर्मित केलेल्या दोन मनुष्यजाती आहेत. या दोन्ही मनुष्यजातीनी एकमेकांच्या सोबत राहावे. त्यांच्यात लिंग गुणोत्तराचे प्रमाण सारखे राहावे हा निसर्गाचा नियम आहे. परंतु असे नाही, भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रियांना असलेले गौण आणि दुयम स्थान यामुळे तिचा जन्म कुटुंबात दुर्देवी मानला जातो. मुलगा झाल्यास कुटुंबात आनंदाचे आणि प्रफुलाचे वातावरण असते. कारण तो वंशाचा एक दिवा असतो. म्हातारपणाचा आधार आणि काठी असतो अशी पालकांची भावना असते. जर एखादा मुलीनी कुटुंबाचे नाव उंचावले किंवा आई वडीलांचे पालनपोषण केले असले तरी त्या मुलींना समाजात काही किंमत दिली जात नाही म्हणूनच समाजात स्त्री ही स्वत:साठी अस्तित्वात नाही तर ती पुरुषांकरिता अस्तीत्वात आहे किंवा पुरुषसमर्थीत आहे असे म्हटल्या जाते.

लैंगिक असमानता ही फक्त भारतातच अस्तीत्वात नाही तर संपुर्ण जगाच्या कानाकोपऱ्यात असल्याचे दिसते. म्हणूनच आज लिंगभभेदभाव निर्मुलनासाठी अनेक राष्ट्रीय, अंतरराष्ट्रीय संघटना उदयास आलेल्या आहेत. त्यापैकी एक संयुक्त राष्ट्र संघटना होय.

मगील दहा वर्षामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञानामध्ये आमुलाग्र बदल घडून आलेत. त्यामध्ये जास्तीतजास्त वाटा हा प्रसारमाध्यमांचा ठरलेला आहे. टि.व्ही., रेडियो, संगणकाबरोबर दुरध्वनी आणि त्यातील विविध प्रणालीचा सर्रास उपयोग ग्रामीण भागात होत असलेला दिसून येतो. आज ग्रामीण भागात घरोघरी टि.व्ही. आणि त्यावर दाखविण्यात येणारे विविध कार्यक्रम, मालिका मोठया आवडीने ग्रामीण महिला आणि पुरुष पहात असल्याचे चित्र दिसून येते.

ग्रामीण समाजामध्ये विशेषत: युवकवर्गामध्ये आजची बदललेली जीवनशैली विशेषत्वाने जाणवते. त्यांचे आचार, विचार, रहनसहन, वेशभूषा, खाण्यापिण्याच्या सवयी आज निश्चितच बदललेल्या आहेत. प्रसारमाध्यमांचा प्रभाव हा जनसामान्याच्या परिणमाबरोबरच त्यांच्या विद्यार्थीदशेतील अपत्यांवर सुध्दा पडलेला दिसून येतो.

स्त्री कडे समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोण बदलायला हवा. म्हातारपणी मुलगाच हाच आधार आहे. हा गैरसमज दूर व्हायला पाहिजे. स्त्री भ्रूण हत्ये मुळे अनेक सामाजिक प्रष्न निर्माण होत आहे. १९७५ हे आंतरराश्ट्रीय महिला वर्श म्हणून संयुक्त राश्ट्रसंघाने घोशित केले. स्त्री सन्मानार्थ पाऊले उचलली गेली पाहिजे. रूढीपरंपरेला थारा न देता परिवर्तनाच्या वाटेने प्रवास करायला पाहिजे. घराण्याची प्रतिश्टा केवळ मुला मुळे प्राप्त होते हे खुळ डोक्यातून काढले पाहिजे. 'भारतात ९३३ मुली हजार पुरूषांच्या मागे स्त्रियांची संख्या आहे. महाराष्ट्रात हिच संख्या ९२२ इतकी आहे. महाराष्ट्र राज्यात गेल्या दहा वर्शात ४ लाख ७८ हजार मुलींच्या गर्भाची हत्या झाली आहे.

१९ वे शतक स्त्री शिक्षण आणि स्त्री प्रबोधनाचे शतक असून औद्योगिक क्रांतीने प्रगती केली. तरी स्त्री भ्रूण हत्येचे प्रमाण कमी झाल्याचे चित्र दिसून येत नाही. उलट त्यात वाढ होतांना दिसून येत आहे. केवळ जागतिक महिला दिनी स्त्रियांच्या कर्तृत्वाचा पाढा वाचला जातो. चर्चा , वादविवाद, परिषदेमधून स्त्री भ्रूण हत्येच्या नाजुक प्रश्नावर चर्चा केली जाते. पण त्यातून काहीच निष्पन्न होतांना दिसून येत नाही.



M.G. Arts, Science & late N.P. Commerce College, Armori
Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli